# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

जा क्र तंशिविकापु/विवि/प्रशिक्षण/ 8368 दिनांक 18 MAY 2010

प्रति,

प्राचार्य,
शासकीय/शासकीय अनुदानित/अशासकीय विनाअनुदानित पदविका संस्था,

विषय :- प्रशिक्षणासाठी अधिव्याख्यात्यांना प्रतिनियुक्त करण्याबाबत.

संदर्भ :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ११/तंशिसं/प्रशिक्षण/२०१०/९ दिनांक १२/०५/२०१०.

उपरोक्त संदर्भानुसार आपणांस कळविण्यांत येते की, एनआयटीटीटीआर, भोपाळ यांचेमार्फत शासनाच्या मागणीनुसार विहित प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यांत येत आहेत. दिनांक १/०४/२०१० पासून ४ प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यांत आले. याबाबतचे कार्यालयीन आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर टाकण्यांत आलेले होते. परंतु सदर प्रशिक्षणासाठी एकही अधिव्याख्याता उपस्थित राहीला नाही. मा.प्रधान सचिवांच्या सुचनेनुसार सदर प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आलेले आहेत. तरी येथून पुढे दररोज प्रशिक्षणाचे कार्यालयीन आदेश संकेतस्थळावर पाहण्यांत यावे व सदर प्रशिक्षणासाठी संबंधितांना प्रशिक्षणास उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात.

प्रशिक्षणाकरिता जे प्राचार्य अधिव्याख्यात्यांना प्रतिनियुक्त करणार नाहीत अथवा जे अधिव्याख्याते प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणार नाहीत त्यांचेवर नियमानुसार कडक कारवाई करण्यांत येईल. याची नोंद घेण्यांत यावी.

(डि. एन. शिंगाडे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये माहितीसाठी सविनय सादर.
श्री. एस. बी. शिंदे, प्रोग्रॅमर, यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.